—: प्रेसनोट :—   दि. ११/०२/२०२१

यातील फिर्यादी हे रहात असलेल्या सोसायटीवर प्रशासक नेमतो तसेच त्यांच्या अर्जाच्या कारवाईत मदत करतो असे सांगुन रु. ३ लाख लाचेची मागणी केली व तडजोडीअंती रु. १ लाख लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा नोंद.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | ०३/२०२१ |
| कलम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | १) गणेश सुखराम राठोड, वय ३४, पद — सहकार अधिकारी, श्रेणी—३,<br>२) गौतम शंकर वर्धन, वय ३९ वर्षे, पद—उपनिबंधक, श्रेणी—१<br>कार्यालय—उपनिबंधक सहकारी संस्था, २रा मजला, एच/पश्चिम विभाग, बांद्रा बस डेपोसमोर, वांद्रे (पश्चिम), मुंबई—५० |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ३,००,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. १,००,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांच्या मालकीचा फ्लॅट असलेल्या सदर सोसायटीतील पदाधिकारी व सचिव यांनी वार्षिक सर्वसाधारण सभा, लेखा परिक्षण, वार्षिक सभेचे इतिवृत्त, अभिलेख जतन न करता सोसायटीच्या कामकाजात अनियमितता असल्याच्या कारणावरुन फिर्यादी यांनी तक्रार अर्ज दिला होता.<br><br>यातील फिर्यादी यांच्या तक्रारीवरुन त्यांच्या सोसायटीवर प्रशासक नेमतो तसेच अर्जाच्या कारवाईत मदत करतो याकरीता आलोसे क्र. १ यांनी स्वत: तसेच आलोसे क्र. २ यांचेकरीता फिर्यादी यांचेकडे लाचेची मागणी केली. परंतु फिर्यादी यांना आलोसे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, मुंबई या कार्यालयात दिनांक १०/०२/२०२१ रोजी आलोसे विरुध्द लेखी तक्रार केली.<br><br>फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक ११/०२/२०२१ रोजी तक्रारीची पडताळणी केली असता, आलोसे क्र. १ याने सोसायटी कमिटी विरोधात कारवाई करण्यासाठी रु. ३,००,०००/— (रुपये तीन लाख) ऐवजी तडजोडीअंती रु. १,००,०००/— (रुपये एक लाख) लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले.<br><br>दिनांक ११/०२/२०२१ रोजी आयोजित सापळा कारवाईमध्ये आलोसे क्र. १ गणेश सुखराम राठोड यांना, फिर्यादी यांचेकडुन रु. १,००,०००/— (रुपये एक लाख) लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडले. |

११/२/२१

( हेमंत सावंत )
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संदर्भात काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ—acbmaharastra.gov.in
ईमेल— १)acbwebmail@mahapolice.gov.in
२)addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज—www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क्र. १०६४
दुरध्वनीक. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००

Scanned by CarbonScanner